श्रीअरविंद विरचित

# दुर्गा स्तोत्र

अनुवाद : डॉ. केतकी मोडक

श्रीअरविंद विरचित

# दुर्गा स्तोत्र

अनुवाद : डॉ. केतकी मोडक

# दुर्गा स्तोत्र

अनुवाद : डॉ. केतकी मोडक
आवृत्ती : फक्त ई-आवृत्ती
प्रकाशक : ज्योतिर्मयी मिडिया हाउस, पुणे
प्रकाशन : २८ ऑक्टोबर २०२३,
कोजागिरी पौर्णिमा
संकेतस्थळ : auromarathi.org

# प्रस्तावना

श्रीअरविंद विरचित 'दुर्गा स्तोत्र' मुळात बंगाली भाषेत आहे. ते त्यांनी इंग्रजी भाषेत अनुवादित केले. ऑक्टोबर १९०९ मध्ये ते 'धर्म' या नियतकालिकामध्ये प्रकाशित करण्यात आले होते.

या स्तोत्राच्या माध्यमातून श्रीअरविंद भारतमातारुपी 'दुर्गा माते'स आवाहन करत आहेत. तिने या भूतलावर प्रकट व्हावे आणि आंतरिक व बाह्य शत्रूंचा नि:पात करावा, अंधकाराचा निरास करून प्रकाशाचे साम्राज्य विस्तारित करावे, यासाठी केलेले हे आवाहन भारतमातेच्या बालकांमध्ये एक नवी चेतना जागविल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास वाटतो.

दुर्गा मातेस केलेले हे आवाहन आज शंभर वर्षानंतरही तितकेच स्फूर्तिदायक ठरते. त्याच्या मनन-चिंतनाने वाचकांच्या मनामध्ये देशप्रेमाचे स्फुरण निर्माण होऊन, भारत मातेच्या आर्यपुत्रांना त्यांच्या जीवितकार्याचे पुन्हा एकवार स्मरण होवो, आणि ते कार्यप्रवृत्त होवोत हीच श्रीअरविंद चरणी विनम्र प्रार्थना.

हे दुर्गा स्तोत्र वाचकांसाठी auromarathi.org या संकेतस्थळावर प्रकाशित करताना विलक्षण समाधान लाभत आहे.

- डॉ. केतकी मोडक

*

## श्रीअरविंद विरचित

# दुर्गास्तोत्र

॥ हे माते दुर्गे, सिंहारूढ सर्वशक्तिदायिनी माते, शिवप्रिये, तुझ्या शक्ती-अंशांपासून उत्पन्न झालेले आम्ही भारताचे नवयुवक, येथे तुझ्या मंदिरामध्ये बसून तुझी प्रार्थना करत आहोत. हे माते, आमचे आर्त तू ऐकावेस ही तुझ्या चरणी विनंती आहे; या पृथ्वीवर अवतीर्ण हो, या भारतभूमीमध्ये स्वत:ला प्रकट कर. ॥ १ ॥

॥ हे दुर्गा माते, युगायुगांपासून जन्मजन्मांतरी मानव देह धारण करून, तुझे कार्य करून आम्ही आनंदधामास परत जात असतो. आणि यावेळीदेखील जन्म घेऊन, तुझ्याच कार्यासाठी आम्ही आमचे जीवन अर्पण केले आहे. हे माते, आमची प्रार्थना तू ऐक; या भूतलावर अवतीर्ण होऊन, आम्हास साहाय्य कर. ॥ २ ॥

॥ हे माते दुर्गे, सिंहारूढ त्रिशूलधारिणी, कवचपरिवेष्टित सौंदर्यमूर्ती, विजयप्रदायिनी माते, तुझे मंगलमय रूप पाहण्यासाठी हा भारत उत्सुक आहे. भारत तुझी प्रतीक्षा करत आहे. माते आमची प्रार्थना ऐक, पृथ्वीवर अवतीर्ण हो, या भारतभूमीमध्ये स्वत:ला प्रकट कर. ॥ ३ ॥

॥ हे माते दुर्गे, शक्तिदायिनी, प्रेमदायिनी, ज्ञानदायिनी माते, सौंदर्यमूर्ती आणि रौद्ररुपिणी हे माते, जेव्हा तू स्वत:च्या शक्तिस्वरूपात असतेस तेव्हा, तू उग्ररूपिणी असतेस. आम्ही जीवनसंग्रामामध्ये, भारताच्या संग्रामामध्ये तुझ्याकडून नियुक्त करण्यात आलेले योद्धे आहोत. हे माते, आमच्या मनाला आणि हृदयाला दानवांसम बल दे, दानवांसम ऊर्जा दे; आणि आमच्या बुद्धीला आणि आत्म्याला देवांचे शील आणि ज्ञान प्रदान कर. ॥ ४ ॥

॥ हे दुर्गा माते, भारत, जगातील सर्वश्रेष्ठ असा हा भारत वंश, (आज) घोर घनांधकारात बुडून गेला आहे. हे माते, तू पूर्वक्षितिजावर

उदय पावतेस तेव्हा, तुझ्या दिव्य गात्रांच्या प्रभेसमवेत उषा येते आणि अंधकाराचा नाश करते. हे माते, सर्वत्र तुझा प्रकाश पसरव आणि तिमिराचा नाश कर. ॥ ५ ॥

॥ हे दुर्गा माते, आम्ही तुझे पुत्र आहोत, तुझ्या कृपाशीर्वादाने आणि तुझ्या प्रभावाने, महान कार्य आणि महान ध्येय यासाठी आम्ही सुपात्र ठरू, असे आम्हाला घडव. हे माते, आमची क्षुद्रता, आमची स्वार्थबुद्धी आणि आमची भीती नाहीशी कर. ॥ ६ ॥

॥ हे माते दुर्गे, तू कालीमाता आहेस; दिगंबरी, नरमुंडमालिनी, खड्गधारिणी तू, असुरांचा विनाश करणारी आहेस. हे देवी, तुझी निर्घृण वीरगर्जना कर आणि आमच्या अंतरंगात ठाण मांडून बसलेल्या शत्रूंचा निःपात कर; एकाही शत्रूला, अगदी एका शत्रूलाही जिवंत ठेवू नकोस. आम्ही निर्मळ आणि निष्कलंक व्हावे, एवढीच आमची प्रार्थना आहे. हे माते, तू आपले रूप प्रकट कर. ॥ ७ ॥

॥ हे दुर्गा माते, स्वार्थ, भीती आणि क्षुद्रता यामध्ये भारत बुडून गेला आहे. हे माते, आम्हास महान बनव, आमचे प्रयत्न (भगीरथासम) महान कर, आमची अंत:करणे विशाल कर आणि आम्हास सत्य-संकल्पाशी एकनिष्ठ राहण्यास शिकव. येथून पुढे तरी आता आम्ही क्षुद्र व शक्तिहीन इच्छा बाळगू नये, आम्ही आळसाच्या आहारी जाऊ नये आणि भीतीने ग्रस्त होऊ नये, अशी आमच्यावर कृपा कर. ॥ ८ ॥

॥ हे माते दुर्गे, (आमची) योगशक्ती विशाल कर. आम्ही तुझे आर्यपुत्र आहोत; आमच्यामध्ये पुन्हा एकवार तीच शिकवण, श्रद्धा आणि भक्ती आणि तेच चारित्र्य, तेच बुद्धी-सामर्थ्य, तप:सामर्थ्य, ब्रह्मचर्याचे तेज आणि सत्य-ज्ञान विकसित कर; त्या साऱ्याचा या जगावर वर्षाव कर. मानववंशाला साहाय्य करण्यासाठी आणि सर्व अनिष्टाचे भंजन करण्यासाठी हे जगत्जननी, तू प्रकट हो. ॥ ९ ॥

॥ हे माते दुर्गे, आधी आमच्यातील अंतस्थ शत्रूंचा संहार कर

आणि तदनंतर बाह्य विघ्नांचे निर्मूलन कर. उदात्त, पराक्रमी आणि बलशाली असा हा भारतवंश, प्रेम आणि ऐक्य, सत्य आणि सामर्थ्य, कला आणि साहित्य, शक्ती आणि ज्ञान यामध्ये सर्वोच्च असलेला हा भारतवंश, त्याच्या पावन वनराजींमध्ये, सुपीक प्रदेशांमध्ये, गगनचुंबी पर्वतरांगांमध्ये आणि वाहणाऱ्या पावन नद्यांकाठी, सदा निवास करो; हीच आमची मातृचरणी प्रार्थना आहे. हे माते, तू आविर्भूत हो. ॥ १० ॥

॥ हे दुर्गा माते, तू तुझ्या योगबलाद्वारे आमच्या शरीरामध्ये प्रवेश कर. आम्ही तुझे साधन होऊ, तुझे सर्व अशुभ-विनाशिनी शस्त्र होऊ; तुझा सर्व अज्ञान-विनाशिनी प्रदीप होऊ. हे माते, तुझ्या या लहानग्या बालकांचे हे आर्त पूर्ण कर. स्वामिनी होऊन तुझे हे साधन कार्यकारी कर. तुझे खड्ग चालव आणि अशुभाचा विनाश कर. दीप हाती घे आणि ज्ञानप्रकाश वितरीत कर. हे माते, तू प्रकट हो. ॥ ११ ॥

॥ हे दुर्गा माते, एकदा का तू आम्हास गवसलीस की, आम्ही तुला कधीही सोडून जाणार नाही. प्रेम व भक्तीच्या धाग्यांनी आम्ही तुझ्याशी (सदैव) संबद्ध राहू. हे माते, ये. आमच्या मनामध्ये, प्राणामध्ये आणि देहामध्ये प्रकट हो; आविर्भूत हो. ॥ १२ ॥

॥ हे वीरमार्गप्रदायिनी ये, आम्ही तुला कधीही सोडून जाणार नाही. आमचे अखिल जीवन म्हणजे मातेचे अखंड पूजन व्हावे; आमच्या प्रेममय, ऊर्जामय सर्व कृती म्हणजे मातेचीच अविरत सेवा व्हावी, हीच आमची प्रार्थना आहे. हे माते, पृथ्वीवर अवतीर्ण हो, या भारतभूमीमध्ये तू स्वत:ला प्रकट कर. ॥ १३ ॥

- **श्रीअरविंद** (The Complete Works of Sri Aurobindo Vol 09 : Pg 03 - 05)

**

# HYMN TO DURGA

II MOTHER DURGA! Rider on the lion, giver of all strength, Mother, beloved of Siva! We born from thy parts of Power, we the youth of India, are seated here in thy temple. Listen, 0 Mother, descend upon earth, make thyself manifest in this land of India. II 1 II

II MOTHER DURGA! From age to age, in life after life, we come down into the human body, do thy work and return to the Home of Delight. Now too we are born, dedicated to thy work. Listen, 0 Mother, descend upon earth, come to our help. II 2 II

II MOTHER DURGA! Rider on the lion, trident in hand, thy body of beauty armour-clad, Mother, giver of victory, India awaits thee, eager to see the gracious form of thine. Listen, 0 Mother, descend upon earth, make thyself manifest in this land of India. II 3 II

II MOTHER DURGA! Giver of force and love and knowledge, terrible art thou in thy own self of might, Mother beautiful and fierce. In the battle of life, in India's battle, we are warriors commissioned by thee; Mother, give to our heart and mind a titan's strength, a titan's energy, to our soul and intelligence a god's character and knowledge. II 4 II

II MOTHER DURGA! India, world's noblest race, lay whelmed in darkness. Mother, thou risest on the eastern horizon, the dawn comes with the glow of thy divine limbs scattering the darkness. Spread thy light, Mother, destroy the darkness. II 5 II

II MOTHER DURGA! We are thy children, through thy grace, by thy influence may we become fit for the great work, for the great Ideal. Mother, destroy our smallness, our selfishness, our fear. II 6 II

II MOTHER DURGA! Thou art Kali, naked, garlanded with human heads, sword in hand, thou slayest the Asura. Goddess, do thou slay with thy pitiless cry the enemies who dwell within us, may none remain alive there, not one. May we become pure and spotless, this is our prayer, 0 Mother, make thyself manifest. II 7 II

II MOTHER DURGA! India lies low in selfishness and fear-fulness and littleness. Make us great, make our efforts great, our hearts vast, make us true to our resolve. May we no longer desire the small, void of energy, given to laziness, stricken with fear. II 8 II

II MOTHER DURGA! Extend wide the power of Yoga. We are thy Aryan children, develop in us again the lost teaching, character, strength of intelligence, faith and devotion, force of austerity, power of chastity and true knowledge, bestow all that upon the world. To help mankind, appear, O Mother of the world, dispel all ills. II 9 II

II MOTHER DURGA! Slay the enemy within, then root out all obstacles outside. May the noble heroic mighty Indian race, supreme in love and unity, truth and strength, arts and letters, force and knowledge ever dwell in its holy wood- lands, its fertile fields, under its sky-scraping hills, along the banks of its

pure-streaming rivers. This is our prayer at the feet of the Mother. Make thyself manifest. II 10 II

II MOTHER DURGA! Enter our bodies in thy Yogic strength. We shall become thy instruments, thy sword slaying all evil, thy lamp dispelling all ignorance. Fulfil this yearning of thy young children, O Mother. Be the master and drive thy instrument, wield thy sword and slay the evil, hold up the lamp and spread the light of knowledge. Make thyself manifest. II 11 II

II MOTHER DURGA! When we possess thee, we shall no longer cast thee away; we shall bind thee to us with the tie of love and devotion. Come, Mother, manifest thyself in our mind and life and body. II 12 II

II Come, Revealer of the hero-path. We shall no longer cast thee away. May our entire life become a ceaseless worship of the Mother, all our acts a continuous service to the Mother, full of love, full of energy. This is our prayer, O Mother, descend upon earth, make thyself manifest in this land of India. II 13 II

- Sri Aurobindo (The Complete Works of Sri Aurobindo Vol 09 : Pg 03 - 05)

**

प्रकाशक : ज्योतिर्मयी मिडिया हाउस, पुणे